गणपती बाप्पा मोरया

महाराष्ट्र टाइम्स

पुणे PLUS

पुणे । गुरुवार, १३ सप्टेंबर २०१८

गुरुवार, १३ सप्टेंबर २०१८




राहुल देशमुख



'महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब' व 'चार्मिंग हॅन्डीक्राफ्टस' यांच्यातर्फे आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या आणि स्व-निर्मितीचा आनंद घेतला.

# पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती

**पुणे :** गणेशोत्सवाला सुरुवात होत असताना विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती करून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाकडे एक पाऊल टाकले आहे. गणेशोत्सवाच्या उत्साही वातावरणात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्वतः तयार करून स्वनिर्मितीचा आनंदही विद्यार्थ्यांनी लुटला. निमित्त होते, 'महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब' व 'चार्मिंग हॅन्डीक्राफ्टस' यांच्यातर्फे आयोजित कार्यशाळेचे!

सिटी इंटरनॅशनल स्कूल, सातारा रस्ता व पिंपरी, लॉयला स्कूल पाषाण व रॉयल वर्ल्ड स्कूल, पिंपरी या शाळांमधील विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत व स्पर्धेत भाग घेतला. कार्यशाळेत शाडूची मूर्ती आणि नैसर्गिक रंगांबद्दल माहिती देण्यात आली. चेतन केतकर यांनी गणेशमूर्तींच्या निर्मितीचे धडे दिले.

पर्यावरणपूरक गणेशमूर्तींविषयी चेतन केतकर यांनी सांगितले, की विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार केल्या. मूर्तींच्या रंगसंगतीसाठी हळद, कुंकू व काव यांचा वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद अभूतपूर्व होता. त्यांनी स्वनिर्मितीचा आनंद लुटला. या कार्यशाळेतील उत्कृष्ट गणेशमूर्तींसाठी श्री पॉइंट अॅडव्हेंचर्सतर्फे बक्षिसे देण्यात आली.

महाराष्ट्र टाइम्स CULTURE Club

**फेसबुक लिंक :** https://www.facebook.com/MTCultureClub
**ट्विटर लिंक :** https://twitter.com/MTCultureClub

**टिप : कल्चर क्लबच्या वेबसाइटवर जाण्यासाठी हा कोड तुमच्या मोबाइलवर स्कॅन करा.**